सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व. का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक ०५/१२/२०२४

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र. जमीन-११२४/प्र.क्र.३१२/पोल-७, दि.०४/१२/२०२४.

**विषय** :- पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर-वसई-विरार अंतर्गत तुळींज पोलीस स्टेशन इमारत बांधण्यासाठी भूसंपादन करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

******

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र. जमीन-११२४ / प्र.क्र.३१२ / पोल-७, दि. ०४/१२/२०२४ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४१२०४१२३८१८३२२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का.)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता

प्रति,

अपर पोलीस महासंचालक, (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर-वसई-विरार.
कार्यासन अधिकारी, का.क्र. २७

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके " सर्वसाधारण " या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर-वसई-विरार अंतर्गत तुळींज पोलीस स्टेशन इमारत बांधण्यासाठी भूसंपादन करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**

**गृह विभाग**

**शासन निर्णय क्र. जमीन-११२४/प्र.क्र.३१२/पोल-७.**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मुंबई - ४०००३२.

दिनांक :- ४ डिसेंबर, २०२४.

**संदर्भ** :-

१. महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील स्वदाखल प्रकरण क्र. १६००/१३/३०/२०२३
२. शासन अधिसूचना, नगर विकास विभाग क्र.टिपीएस-१२२१/१०४२/प्र.क्र.१०२/२१/नवि-१२, दि.१२.०७.२०२४
३. वसई विरार शहर महानगरपालिका यांचे पत्र, जावक क्र.व.वि.श.म./मा.व्य./१११/२०२४, दि. ०५.०९.२०२४९
४. पोलीस महासंचालक कार्यालयाचे पत्र, क्र. पोमसं/२७/तुळींज पोस्टे/भूसंपादन/पो.आ.मिरा-भाईंदर/४४/२०२४, दि. ०९.१०.२०२४

**प्रस्तावना :-**

वसई-विरार परीसरातील तुळींज पोलीस स्टेशन च्या इमारतीच्या दुरावस्थेबाबत दै. मिड-डे वृत्तपत्रातील दिनांक ३.०४.२०२३ मधील बातमीची महाराष्ट्र मानवाधिकार आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांनी स्वदखल घेऊन त्यांच्या समक्ष दावा क्र. Suo-Motu Case No. १६००/१३/३०/ २०२३ दाखल करुन घेतला आहे. तुळींज पोलीस स्टेशन साठी भूसंपादन करण्याकरिता रू.३,५६,९७,५००/- (अक्षरी रक्कम रुपये तीन कोटी छप्पन लाख सत्याण्णव हजार पाचशे रुपये फक्त) इतका निधी उपलब्ध करुन देण्याबाबत पोलीस आयुक्त, मिरा-भाईदर-वसई-विरार यांनी पोलीस महासंचालक कार्यालयामार्फत संदर्भ क्र. ४ येथील पत्रान्वये विनंती केली आहे. त्याअनुषंगाने तुळींज पोलीस स्टेशन इमारतीच्या बांधकामासाठी भूसंपादन करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> :-**

मा. मानवी हक्क आयोगात संदर्भ क्र. १ येथील दाव्यासंदर्भात झालेल्या सुनावणीच्या अनुषंगाने पोलीस आयुक्त, मिरा-भायंदर, वसई-विरार यांनी सदर पोलीस ठाण्याचे स्थलांतर करण्यासाठी तुळींज येथील मैदानाचे आरक्षण बदलून सरकारी कार्यालयासाठी ३१८३ चौ. मी. जागा देण्याचा प्रस्ताव नगर विकास विभागास सादर करण्यात आला होता. त्यानुसार नगर विकास विभागाच्या संदर्भ क्र.२ येथील दि.१२/०७/२०२४ रोजीच्या अधिसुचने अन्वये, मौजे तुळींज येथील सर्वे नं. ८५ पै. ८६ पै, ९१,९२,पै व ९३

पै या जमिनी आ.क्र. ३२९ "खेळाचे मैदान" क्षेत्र २०,६८४.०० चौ.मी. याकरिता आरक्षित असलेल्या क्षेत्रामधून ३१८३.०० चौ.मी. क्षेत्र वगळण्यात आले आहे, असे वगळण्यात आलेले क्षेत्र आरक्षण क्र.३२९-अ 'सरकारी कार्यालय' याकरिता आरक्षित करण्यात आले आहे.

२. उक्त क्षेत्रापैकी सद्यस्थितीत महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या २७२५.०० चौ.मी. क्षेत्राची २०२४-२०२५ वर्षातील बाजारभावानुसार एकूण रू.३,५६,९७,५००/- (अक्षरी रक्कम रुपये तीन कोटी छप्पन लाख सत्याण्णव हजार पाचशे रुपये फक्त) इतकी रक्कम महानगरपालिकेस भरणा करण्याबाबत वसई-विरार शहर महानगरपालिका यांनी संदर्भ क्र. ३ येथील दि.०५.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये वरिष्ठ पोलीस निरीक्षक, तुळींज पोलीस ठाणे यांना कळविले आहे.

३. त्याअनुषंगाने संदर्भ क्र. ४ येथील पोलीस आयुक्त, मिरा-भाईदर-वसई-विरार यांनी पोलीस महासंचालक कार्यालयामार्फत केलेल्या विनंतीस अनुसरुन, मौजे तुळींज येथील सर्वे नं. ८६ पैकी ३१८३.०० चौ.मी. इतक्या क्षेत्राचे भूसंपादन करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

४. या प्रयोजनासाठी येणारा खर्च हा 'मागणी क्र. बी. १०, ४०७०, इतर प्रशासनिक सेवांवरील भांडवली खर्च, ००, ८००, इतर खर्च (००) (००) (०७) पोलीसांकरीता भूसंपादन आणि इमारतीचे बांधकाम यावरील खर्च (४०७० ०१४२) (कार्यक्रम) ५३-मोठी बांधकामे' लेखाशिर्षाखाली उपलब्ध असलेल्या अनुदानामधून भागविण्यात यावा.

५. सदर शासन ज्ञापन, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका भाग पहिला, उप विभाग-तीन, अ.क्र.४, परिच्छेद २७(२), अनुसार प्रशासनिक विभागास प्राप्त अधिकारात सक्षम प्राधिका-याच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४१२०४१२३८१८३२२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

CHHAYA NATHU MALI

Digitally signed by CHHAYA NATHU MALI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=cd4e9f6041c76a9f3fd5cbcbc45affce68bbd6f32230f05b4a2b54b875937776, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=B20C807A33573110F6D8441C862B04F58811935279DCAD666C42A2FABC6C24E8, cn=CHHAYA NATHU MALI
Date: 2024.12.04 12:39:53 +05'30'

**(छाया न. माळी)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर-वसई-विरार
३) आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका
४) उप सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
५) निवड नस्ती, पोल-७, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई